महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# बारामती परिमंडळ, बारामती.

CIN: U40109MH2005SGC153645
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

दाखल तारीख :–२४/०७/२०१९
आदेश तारीख :–२३/०९/२०१९

**<u>आदेश</u>**

केस क्र. १४/२०१९

| | |
|---|---|
| १) श्री. रविकांत भाऊसाहेब गायकवाड .,<br>मु.पो. खामगाव, साखरवाडी,<br>फलटण, जि. सातारा. | तक्रार अर्जदार (ग्राहक) |

**<u>विरुध्द</u>**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता.,<br>म.रा.वि.वि.कं.मर्या,<br>फलटण विभागीय कार्यालय. | विरुध्द पक्षकार (महावितरण) |

कोरमः–
१) श्री. बी. डी. गायकवाड, अध्यक्ष,
२) श्री. एस. के. जाधव, ग्राहक सदस्य,
३) श्री. एम. ए. लवटे, सदस्य सचिव,

उपस्थितीः–
१) श्री. बी. वाय. खिलारे, उप.का.अ., म.रा.वि.वि.कं.मर्या. फलटण.
२) श्री. संजय जाधव, सहाय्यक लेखापाल., म.रा.वि.वि.कं.मर्या. फलटण.

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६, मधील ८.४ चे तरतुदीनुसार

### तक्रारीचे स्वरुप

तक्रारदार ग्राहक श्री. रविकांत भाऊसाहेब गायकवाड, मु. खामगाव, पो. साखरवाडी, ता. फलटण, जि. सातारा यांचे ग्राहक क्र. २०७७७०४१९२५९ ने शेतीपंपाचे ५ एचपी कनेक्शन आहे. सदर शेतीपंपाच्या कनेक्शनला मीटर आहे. रोहित्र जळाल्यामुळे मीटर जळाला तो बदलून द्यावा. जळालेला मीटर बदलण्यास उशीर झाला त्याची भरपाई (एसओपी) मिळावी अशी तक्रार दाखल केली आहे.

### ग्राहक यांचा तोंडी वं लेखी युक्तीवाद

तक्रारदार ग्राहक यांना दि.२०.०८.२०१९ रोजीच्या सुनावणीसाठी रितसर आगाऊ नोटीस दिलेली होती. सदर सुनावणी दिवशी ग्राहक आलेले होते. परंतू मंचासमोर सुरु असलेल्या तक्रारीची सुनावणी संपल्या नंतर सदर तक्रारीचे ग्राहक श्री. रविकांत भाऊसाहेब गायकवाड यांना पुकारण्यात आले. परंतू ते हजर झाले नाहीत.

दिनांक–३०.०८.२०१९च्या सुनावणीची रितसर आगाऊ नोटीस दिलेली होती. सदर सुनावणीस देखील ग्राहक श्री. रविकांत भाऊसाहेब गायकवाड हे हजर राहिले नाहीत. दोन वेळा सुनावणीची संधी देवूनही ग्राहक हजर राहिले नाहीत. त्यामुळे लेखी तोंडी युक्तीवाद ऐकता आला नाही.

### विरुध्द पक्षकार (महावितरण) यांचा तोंडी व लेखी युक्तीवाद

तक्रारदार ग्राहक श्री. रविकांत भाऊसाहेब गायकवाड यांना जळालेल्या मीटरची किंमत भरल्यानंतर नवीन मीटर देण्यात येईल असे सांगण्यात आले होते. परंतू श्री. रविकांत भाऊसाहेब गायकवाड यांनीमीटरची किंमत अद्याप भरलेली नाही. मीटरची किंमत भरल्यानंतर नवीन मीटर देण्यात येईल.

तक्रारदार ग्राहक यांनी भरपाई (एसओपी)ची मागणी केलेली आहे. त्यांच्याकडे शेतीपंप थकबाकी रुपये ५९५२०/– इतकी आहे. तसेच जळालेल्या मीटरची किंमत भरलेली नाही. त्यामुळे भरपाई (एसओपी) ची मागणी मान्य करु नये.

## कारणमिमांसा

कागदपत्राचे अवलोकन करता दि. १९.०२.२०१९ रोजी रोहित्र नादुरुस्त झाल्यामुळे शेतीपंपाचा मीटर जळला. सदर मीटर हा वितरण व्यवस्थेतील दोषामुळे जळाला असल्यामुळे तो वीज वितरण कंपनीने बदलून देणे क्रमप्राप्त आहे. असे तक्रारदार ग्राहकाने नमूद केले आहे. वीज मीटर कोणाच्या चुकीमुळे जळाला याची तपासणी करण्यात यावी. असेही तक्रारदार ग्राहकाने नमूद केले आहें.

जाब देणारे महावितरण यांनी जळालेल्या मीटरची किंमत भरल्यानंतर मीटर बसविणेत येईल असे म्हटले आहे.

वास्तविक पाहता The Maharashtra Electricity Regulatory Commission. (Electricity Supply Code and other Conditions of supply) Regulation 2005 मधील तरतुद 21.3. Burnt Meter मधील तरतुद 21.3.1 Where upon a complaint by the consumer or inspection by the auzthorized represenatiive of the MSEDCL, Meter is found. to be burnt the MSEDCL shall recover the cost/price of the meter from the consumer, the cost of other apparatus and any other applicable deposits and charges based on the "schedule of charges" as approval or as may be approved or as may be approved by the commission and shall restore the power supply. After replacement of the meter within 24 hour in town cities and 48 hours in rural areas and failing to do so shall pay compensation as per appendix A of prevailing standard of performance regulations,

मार्च २०१९ व जून २०१९ च्या वीजदेयकावर "Burnt" असा शेरा नसून "Meter Status- Faulty "असा शेरा आहे. जाब देणार यांनी मीटर जळालेचा तपासणी रिपोर्ट सादर केलेला नाही. त्यामुळे मीटर जळाला हे मंच मान्य करीत नाही.

"Faulty" असा शेरा असल्यामुळे मीटरची किंमत न भरता माहावितरणकडून मीटर मिळणेस ग्राहक पात्र आहे.

तक्रारदार ग्राहकाने जळालेला मीटर बसविण्यास विलंब झाला म्हणून त्याची भरपाई (एसओपी) मिळावी अशी मागणी केलेली आहे. मात्र वीज देयकावर "Faulty" असा शेरा आहे.

वास्तविक पाहता The Maharashtra Electricity Regulatory Commission. (Standards of Performance of distribution Lincensees, Period for giving supply and Determinsation of Compensation) Regulation 2014. मधील Apperdix –A मधील Supply Activity मधील 4 Meters मधील (ii) Replacement of Meter if found faulty-standard- within subsequent billing cycle compensation payble- तरतूद Rs. 50 per hour or part of delay.

तक्रारदार ग्राहकाकडे थकबाकी रुपये ५९५२०/– इतकी आहे. त्यामुळे तक्रारदार भरपाई (एसओपी) मिळणेस पात्र होऊ शकत नाही. असे मंचाचे मत आहे.

मंच पुढील आदेश करीत आहे.

## आदेश

१) तक्रार अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) मीटरची किंमत भरुन न घेता ओदश मिळालेपासून ४८तासाच्या आत मीटर बसविणेत यावा.

३) वरील आदेशाचे पालन करुन आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसाचे आत मंचास अहवाल सादर करावा.

(श्री. बी. डी. गायकवाड)
अध्यक्ष

(श्री. एस. के. जाधव )
ग्राहक सदस्य,

(श्री. एम. ए. लवटे )
सदस्य सचिव

वरील आदेश आपणास मान्या नसल्यास विद्युत लोकपाल मुंबई यांच्याकडे ६० दिवसाच्या आत अपिल दाखल करु शकता.

विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र राज्य नियामक आयोग, ६०६/६०८, केशव बिल्डींग,
बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स, बांद्रा (ईस्ट), मुंबई—५१.